
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५३ वे, अंक ८वा, मुंबई । ऑक्टोबर २०२२
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

प्रिय ज्ञाती बंधू भगिनींनो,
सप्रेम नमस्कार

सन २००४ सगरोळी, नांदेड (महाराष्ट्र) नंतर बडोदा (गुजरात) येथे १२ व १३ नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्या अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची परिषद अधिवेशन संस्थेचे अध्यक्ष श्री विलासराव जोशी व कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली व बडोदा संस्थेचे अध्यक्ष श्री नितिन शाहपुरकर आणि सर्व पदाधिकारी सहकारी यांच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

सामाजिक, सांस्कृतिक आणि उद्योग क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे श्री मुकुंद नारायण कुलकर्णी हे संम्मेलन अध्यक्ष असतील. मा. अध्यक्ष, कार्याध्यक्ष व मान्यवरांचे मार्गदर्शन, आपला ज्ञातिचा इतिहास, संस्थेचे स्वरूप, कार्य,उद्दिष्टे यासह ज्ञातीतील तरुणांपुढे उभी राहिलेली आव्हाने, समस्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल ब्राह्मणांचे प्रश्न, तरुणांना उद्योगा विषयी मार्गदर्शन, महिलांचे सबलीकरण आणि त्यासाठी समाजातील प्रतिष्ठितांचे मार्गदर्शक प्रयत्न, तज्ञांचे मार्गदर्शन आणि या परिषदेनिमित्त स्मरणिका प्रकाशन अश्या भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा प्रयत्न आहे.

१९४८ च्या गांधी हत्येनंतर ब्राह्मण द्वेषाने बरबटलेले भ्रष्ट राजकारण आता हिंदुत्व आणि ब्राह्मण्य न मानण्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. कोणी कांहीही म्हणो पण ब्राह्मण समाजाची दखल सर्व स्तरावर घेतली जात आहे यापुढेही जाईल मात्र त्यासाठी ब्राह्मण समाजाने संघटित राहण्याची गरजही आहे. देव, देश आणि धर्म या त्रीसूत्रीवर आधारित आपली सर्वांचीच कर्तव्यता असायला हवी. ब्राह्मण समाजाने कायमच ही त्रिसूत्री आपल्या दैनंदिन व्यवहारात आचरणात आणली आहे. एवढेच नाही तर देशव्यापक दृष्टिकोनही नेहमीच बाळगला आहे. त्या दृष्टीने कार्यही केले आहे. हिंदुत्वाची कास धरणारा ब्राह्मण समाज नेहमीच देशकार्यात अग्रेसर राहिला आहे. आपल्या देशाचा गेल्या किमान २०० वर्षाचा इतिहास आपण पाहिला तर असे लक्षात येईल ब्राह्मण समाजातील असंख्य थोर व्यक्तींनी आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण केले आहे याची जाणीव आपल्याला नित्य असायला हवी. रक्षण, संरक्षण, संघटन शक्ती, संवर्धन व सर्व क्षेत्रात सुदृढीकरण करणे हा या महाअधिवेशनाचा प्रमुख हेतू आहे. या महाअधिवेशनास उत्तम प्रतिसाद लाभतो आहे आणि हा देखणा सोहळा बडोदा येथे संपन्न होणार हे आपल्या सर्वांच्या एकजुटीनेच.

आपण ब्राह्मण ज्ञानप्रक्रियेशी निगडित राहणं व त्याप्रमाणे असेल त्या क्षेत्रात आचरण ठेवणे, सर्व मतभेद विसरून एकात्म राहणं ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्रासह विविध क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा, कलेचा, अभिनयाचा, कौशल्याचा, व्यापार, उद्योगाचाही ठसा ज्ञातीतील अनेक मान्यवरांनी उमटविलेला आहे ज्ञातीतील आजच्या ब्राह्मण तरुणांपुढे त्यांचा आदर्श आहे. या सगळ्यां मान्यवरांना समाजभूषण तसेच अनेक पुरस्कार देऊन आपण गौरव करणार आहोत. बडोदा येथील या राष्ट्रिय महाधिवेशनला परिषदेला चला एकत्र येऊया आणि आपली संस्कृती जपूया. समृद्ध ब्राह्मण, संपन्न ब्राह्मण!

**– मिलिंद सरदेशमुख**
संपादक




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३वे, अंक ८वा,
ऑक्टोबर २०२२
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई-मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in





**वार्षिक सर्वसाधारण सभा २०२२**
**श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांची संमेलनाध्यक्ष म्हणून निवड**



**सौ. केतकी कुलकर्णी, सचिव कोथरूड शाखा यांचा वार्षिक सर्वसाधारण सभेत गौरव**



**सोलापूर संस्थेतर्फे ५५ पुरोहितांना अन्नधान्य वाटप**



HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving 75+ Countries Worldwide
30+ YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire


IndusInd Bank
INDIA'S BEST BANKS AWARDS
FE
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE*
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.

# नको रे मना क्रोध हा खेदकारी।

**सौ. पद्मा मांडवगणे** (मो. ७२६३९५४६१४)

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. संत हे मानवी मनाला लाभलेलं मोठ वरदान आहे. समाजजीवनाची मूल्यें जपण्याचे कार्य संतांनी केले आहे. समाजाला स्वकर्तव्याची जाणीव करून दिली आणि आत्मध्दिराचा मार्ग दाखवला. समाज जागृतीसाठी ज्या संतांनी कार्य केलं त्या मांदियाळीत संत श्री रामदासस्वामींचे योगदान महत्त्वाच ठरत.

श्री समर्थांनी वयाची चोवीस ते छत्तीस, म्हणजे बारा वर्षे भारतभ्रमण केलं. या आसेतु हिमाचल भ्रमणात त्यांना तत्कालीन परिस्थिती लक्षात आली. सर्व बाजूनी रसातळाला गेलेल्या भयग्रस्त समाजाची जाणीव झाली. मनगटांत जोर असून किंकर्तव्यमूढ अशा गलितगात्र समाजाची ही दयनीय स्थिती पाहून त्यांचे अंतःकरण व्यथित झाले. समाजाचे आत्मबळ वाढवून समाजाला कार्यप्रवण करण्याचं कार्य हाती घेतलं. त्यासाठी सर्वप्रथम समाजमनांत यमहाराष्ट्र धर्म वाढवावाल ही भावना रुजवली, आणि त्यांना स्वकर्तव्याची जाणीव करून दिली. 'उद्धटासी उद्धट खटनटाशी खटनट' या शब्दातून प्रतिकार शक्ती वाढवली शिवाय 'समर्थाचिया सेवका वक्रपाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे?' या खणखणीत शब्दातून समाजमनातील सत्ताधाऱ्यांबद्दलची भीती दूर केली, त्यांच्यातील आस्मता जागवली व मनांत चैतन्य निर्माण केले. त्यासाठी ययत्न तो देव जाणावाल हा मंत्र सांगून समाजाला कार्यप्रवण केलं, त्यांना जागृत केलं. समाजाच्या कल्याणापोटी, त्यांच्या स्वोद्धारासाठी त्यांनी आपलं सारं आयुष्य वेचल आणि 'कल्याणकारी रामराया' अशी प्रभुरामचंद्राच्या चरणी प्रार्थना केली. 'अवघेचि सुखी असावे ऐसा काळ फावे' हे त्यांच्या कार्याचं एकमेव ध्येय होतं, त्यासाठीच त्यांचे प्रयास होते,

**नको रे मना क्रोध हा खेदकारी। नको रे मना काम नाना विकारी।**

या श्लोकातून समर्थांनी षड्विकार हे कसे घातक आहेत याबद्दल मनाला सावध केले आहे. मानसी मनावर मनाचं अधिराज्य व त्यानुसार मनुष्याचं आचरण असतं. त्यांत षड्रिपूचा मनावर जबरदस्त पगडा असतो.

**यमन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।।**

मनामुळेच मनुष्य गुंततो व मनामुळेच तो त्यातून सुटकाही करून घेऊ शकतो, हे जाणून समर्थांनी मनाचे श्लोक लिहिले, देहाचे नाही. चंचलता हा तर मनाचा स्थायीभाव. आपले सर्व व्यवहार मनावरंच अवलंबून असतात. मानवी बुध्दी ही ज्ञानार्जनासाठी पण मन मात्र भावनेशी जोडलेलं असतं, निगडीत असतं. मनावर ताबा ठेवणं महाकठीण. सर्वसाधारणपणे षड्विकारांचा क्रमांत काम विकाराला प्रथम स्थान असतं. पण समर्थांनी क्रोधाला प्रथम स्थान दिलं आहे. मानवी जीवनात या विकाराला व्यवहार चालविण्या इतपत स्थान आहे, यात शंका नाही. पण माणूस हा समूहामध्ये जगतो. प्रत्येक समूहाची एक घडण असते. या घडणीत आपल्या वागण्याने संघर्ष निर्माण होणार नाही, एवढाच विकाराचा वापर करणे जरुरीचे आहे. पण मनुष्यस्वभाव असा असतो की आपलं सर्वांनी ऐकावं, मान द्यावा. मी इतकं हिताचं करतो, पण इतरांच्या ते लेखी नाही, त्याची मुळी किंमतच नाही. मनातली ही जाणीवच क्रोध निर्माण करते. त्यामुळे सारासार विचार नष्ट होऊन हातून दुर्वर्तन घडतं. क्रोधामुळे मनुष्य स्वयंकेंद्रित बनतो, त्याला कोणाचेच पटत नाही, तो कोणाचं ऐकत सुध्दा नाही. त्याच्या मनांत इतरांचा विचारही येत नाही. मग सहानुभूती तर दूरच. क्रोध म्हणजे संताप, राग. त्यामुळे हे सारं असं घडतं. क्रोध अत्यंत अनर्थकारी, बुध्दिभ्रष्ट करणारा. त्यामुळे दुष्टकृत्य घडतं. क्रोधामुळे सनत् कुमारांना प्रभुच्या सातव्या दारापासून माघारी जावं लागलं होतं. भगवंत स्वतःच दारापाशी आले व त्यांना दर्शन

दिले. मात्र भगवंताच्या महालात ते प्रवेश करु शकले नाही. उलट शापवाणीच त्यांच्या तोंडून बाहेर पडली, ती क्रोधामुळेच. म्हणून आपल्या भोवतालचं वातावरण खिन्न करणारा क्रोध बाळगू नको, असे समर्थ बजावतात, व क्रोधावर ताबा ठेवणे, आवर घालणे हे अशक्य असले, तरी प्रयत्न केल्यास साध्य होऊ शकते. असाध्य ते साध्य, करिता सायास, कारण अभ्यास, तुका म्हणे अर्थात क्रोध हा कामाचा लहान भाऊ. फार सावध होऊन कामाला मारणे शक्य होते. पण क्रोधाला मारणे कठीण. क्रोधावर ताबा ठेवण्यासाठी करिता सायास, असाध्य ते साध्य होईल हे निश्चित.

गीतेतही भगवंतांनी - यक्रोधोद्भवतिसंमोइः। संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद बुध्दिनाशो। बुध्दिनाशात् प्रणश्यति।। हा उपदेश केला आहे.

परमार्थ मार्गात किंवा अध्यात्मिकतेत कामापेक्षा क्रोध अधिक अडथळा निर्माण करणारा आहे, असे मानले जाते. पुढच्या चरणात यकाम नाना विकारील असे समर्थ सांगतात. साधारणपणे काम या शब्दाचा अर्थ स्त्रीपुरुष संबंधाची अभिलाषा असा गृहीत धरला जातो. खरं म्हणजे कोणतीही इच्छा होणे, काही हवेसे वाटणे व ते मिळाले नाही तर बैचेन होणे, या सर्व वृत्ती काम या शब्दांत मोडतात. अनेक प्रकारच्या कारणांनी, मनाला आणि इंद्रियांना विषयाची चटक लागते. ही लागणारी चटक 'काम' या शब्दाने अभिप्रेत होते. निरनिराळ्या ज्ञानेंद्रियांना, कर्मेद्रियांना सुखावह वाटणाऱ्या अनेक प्रकारच्या शारीरिक अभिलाषा आणि सत्ता-संपत्ती, मानमरातब इत्यादि मानसिक अभिलाषा, ही सर्व कामाचीच प्रतिके होत. त्यामुळेच नाना प्रकारचे विकार निर्माण होतात, की जे सर्वनाशाला कारणीभूत ठरतात म्हणून 'नको रे मना सर्वदा अंगिकारु'. म्हणून हे मना, त्या विकाराचा अंगिकार करुं नको.

श्लोकाच्या शेवटच्या चरणात समर्थ बजावतात की, 'नको रे मना मत्सरु दंभभारु', तेव्हा मद-मत्सर ह्या शतूंना (विकारांना) थारा देऊ नको. मद म्हणजे ताठा, उन्मत्तपणा. हे सारे विकार म्हणजे अहंकाराचे विकृत स्वरुपच. कारण अहंकारामुळे मीच मोठा ही भावना बळावते. स्वतःचे दोष दिसत नाहीत आणि जर कोणी ते दाखविले, तर ते पटत नाही. अहंभाव दुखावतो, त्यामुळे सुधारणा होऊ शकत नाही. उलट मत्सर वाढतो. मत्सराला कारणीभूत होणारी पहिली गोष्ट म्हणजे मनुष्याचा तुलना करण्याचा स्वभाव. त्यातून मत्सर जागृत होतो. ही तुलना कधी कौटुंबिक स्तरावर तर कधी शालेय जीवनांत तर सामाजिक स्तरावर केली जाते. तुलना ही दोन व्यक्तीत वैमनस्य निर्माण करते, अस्वस्थता वाढवते. आपल्याकडे नसलेली गोष्ट दुसऱ्याजवळ असली तरी मत्सर वाढतो. मला पाहिजे ते दुसऱ्याला मिळाले, तरी मत्सर वाढतो, असा हा मत्सराचा प्रभाव पण अशा वेळी माझ्याजवळ आहे ते त्यांच्याजवळ नाही हा विचार कोणीच करीत नाही. प्रत्येकाजवळ काही ना काही गुण असतातच पण मत्सरामुळे सारासार विचार रहात नाही. मत्सर हा मोठ मोठ्या ऋषी-मुनींनाही सुटला नाही. मत्सर दुबळेपणाचे, अगतिकपणाचे प्रतीक आहे. सर्वसाधारपणे प्रत्येकाचे ठायी एखादा तरी विकार प्रबळ असतो. तो नाशास कारणीभूत होतो. म्हणून तुलना करण्याची भावना झटकून टाकली तर मत्सर आपोआप गळून पडेल.

जीवनांत दुःखाला कारणीभूत होणाऱ्या या षड्विकारांना आवर घातल्यास समाधानी व आनंदी जीवन जगता येईल, व्यक्ती सुधारली तर समाजही सुधारेल. त्यामुळे मानव जातीचे कल्याण होईल. समर्थ रामदासांनी अशा समाधानी व आनंदी समाजनिर्मितीसाठी आयुष्यभर प्रयत्न केले.

तात्पर्य, जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती - देह कष्टवित्ती परोपकार।।

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# कडवे सत्य

**डॉ. लक्ष्मीकांत दाणी** (मो. : ९८२०४३७०७३)

कितीही पैसे द्या कामवाली घरच्या सारखं झाडत नाही आणि पोळीवाली आपल्या सारख्या पोळ्या करत नाही.... आई वडिलांसारखी छाया नाही आणि भावंडांसारखी माया नाही.... हॉटेलच्या बिर्याणीला घरच्या खिचडीची चव नाही आणि कितीही यूट्यूब बघा थिएटरची सर नाही.... साडीतलं सौंदर्य कुठल्याच पोशाखात नाही आणि कितीही मेकअप करा साधेपणा सारखं सौंदर्य नाही.... कितीही कलमं करा गावठी गुलाबाला तोड नाही आणि कितीही अत्तरं आणा जुई आणि मोगऱ्याची सर नाही.... शेताची सर बागेला नाही आणि बागेची सर टेरेसला नाही.... भाजीभाकरीची चव पिझ्झा बर्गरला नाही आणि ग्राउंडची सर जिमला नाही....

स्वतः सांगितल्याशिवाय प्रेमासारखं निरागस प्रेम नाही आणि जीवनांत प्रेम करणाऱ्या जोडीदारासारखा आधार नाही.... कितीही tally वापरा त्याला खतावणीची सर नाही आणि पावकी-निमकीची मजा कॅलक्युलेटरमधे नाही.... कितीही परिश्रम करा दैवाशिवाय काही मिळत नाही आणि कितीही हुशार असा ईश्वरापुढं कुणाचंच चालत नाही.... कितीही पाणी द्या पावसाशिवाय झाड काही खुलत नाही कितीही पैसे असुद्या पण माणसांशिवाय काही भागत नाही.... खरे प्रेम केल्याशिवाय प्रेमाची गोडी समजत नाही आपल्या आवडत्या व्यक्तिबरोबर बोलल्याशिवाय मन मोकळे होत नाही.... अनुभवासारखा शिक्षक नाही आणि आयुष्य जगल्याशिवाय समजतच नाही.... मुलांशिवाय घराला शोभा नाही आणि नातवंडांसारखा परमानंद जगात नाही.... शालीनतेसारखा दागिना नाही आणि झोपडीचं प्रेम बंगल्यात नाही.... स्वार्थापेक्षा मोठा शत्रू नाही आणि परोपकारासारखं पुण्य नाही....

सुखाच्या क्षणी माणसांशिवाय-मित्रांशिवाय शोभा नाही पण दुःखाशिवाय आपलं कोण ते कळतंच नाही.... भक्ती सारखी शांतता कशातच नाही आणि भगवंता एवढं बलवान कुणीच नाही.... घरची माया वृद्धाश्रमात नाही आणि म्हातारपणी कुटूंबाशिवाय आणि सच्च्या मित्राशिवाय कुणीच नाही....


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मी नारायण बाग, बाळ गोविंदासमार्ग, माहीम, मुंबई-४०००१६. दूरध्वनी : ०२२-२४३०२२७३/ २४३०७५७६ ई-मेल : aadrbm@gmail.com संकेतस्थळ : www.adrbmmahim.in**

## मध्यवर्ती वधु-वर सूचक केंद्र

*** ब्राह्मण उपवर वधु-वरांची तसेच घटस्फोटीत/पुनर्विवाह नावनोंदणी ***

*** वधू/वर नोंदणी माफक दरात (वार्षिक रु. ५००/-) ***

*** समाचार मासिकात विनामूल्य प्रसिद्धी ***

*** सर्वसोयींनी उपलब्ध वातानुकूलित मंगल कार्यालय ***

*** तज्ज्ञांचे मार्गदर्शन ***

***(संस्थेचा सामाजिक उपक्रम आजच संपर्क करा)***

## ऋग्वेद भूषण - श्रीराम कुलकर्णी



आंतरराष्ट्रीय स्तरावर पाणी व्यवस्थापन तंत्र विकसित करणारे श्री. एन.बी.एच कुलकर्णी यांच्यासारख्या दिग्गज उद्योजकाचे चिरंजीव श्रीराम कुलकर्णी. यांनी कानपूर आय.आय.टी मधून १९८८ मध्ये रसायन शास्त्रातील बीटेक ही पदवी घेतली. १९९० मध्ये अमेरीकेत जाऊन उच्च शिक्षणही पूर्ण केले. सुरुवातीला नोकरी करुन वॉटर ट्रीटमेंट या विषयातले सखोल ज्ञान मिळविले. परंतु वडीलांच्या उद्योजकीय संस्कारामुळे अमेरीकेत नोकरीमध्ये मन रमेना म्हणून २००२ मध्ये श्रीराम कुलकर्णी यांनी भारतात येऊन पाणी व्यवस्थापन आणि इंडस्ट्रीयल वेस्ट ट्रीटमेंट या दोन क्षेत्रामध्ये उद्योग सुरु केला. उत्पादन करताना कारखान्यातून बाहेर पडणारी रासायनिक द्रव्ये निसर्गाला प्रदुषित करीत असतात. यासाठी Common Effluent Treatment Plant ही आधुनिक संकल्पना वापरुन वातावरणातील प्रदुषण तर कमी केलचं परंतु या टाकाऊ घटकांचा पुर्नवापरही केला. कारखान्यामध्ये आणखी एक महत्त्वाचा घटक तयार होतो, तो म्हणजे प्रचंड प्रमाणात उष्णता. उदा. सिमेंट उद्योग. कोणतीही उष्णता बाहेर पडली की ती प्रदुषण तयार करते आणि पृथ्वीच्या तापमानातही प्रचंड प्रमाणात वाढ तयार होते. परंतु या वाया जाणाऱ्या उष्णतेपासुन वीज निर्मिती करण्याचे महत्त्वाचे काम श्री. श्रीराम कुलकर्णी यांनी केले आहे. श्री. श्रीराम कुलकर्णी यांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे वॉटर डिसलायझेशन म्हणजेच खाऱ्या पाण्याचे गोडे पाणी करणे. भविष्यातील पाण्याची गरज ओळखून वाळवंटी आणि खार पाणी क्षेत्रात वॉटर डिसलायझेशनचा प्लांट हा एक अनोख्या उद्योगाचा त्यांनी झेंडा रोवला आहे.

श्री. श्रीराम कुलकर्णी यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक व्याख्याने दिली आहेत. तसेच त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात देखील आले आहे. २९ एप्रिल २०२२ रोजी पुणे येथे बी.बी.एन.जी. मार्फत श्री. चैतन्य महाराज देगलुरकर आणि प्रकाश जावडेकर, केंद्रिय मंत्री यांच्या हस्ते यउद्यम कौस्तुभ पुरस्कारल श्री. श्रीराम कुलकर्णी यांना देण्यात आला. विद्याप्रसारक मंडळ या संस्थेच्या माध्यमातून शालेय शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आणि त्यांचे योगदान हे खूप मोठे आहे. श्री. श्रीराम कुलकर्णी यांची औद्योगिक आणि सामाजिक कारकीर्द यशदायी जावो हीच शुभेच्छा.

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**

## उद्योग भूषण डॉ श्री जितेंद्र जोशी



डॉ जितेंद्र जोशी हे अभि उद्योग समूहाचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. त्यासोबत ते ग्लोबल इंडियन बिझनेस फोरमचे अध्यक्ष देखील आहेत. स्वकष्ट, जिद्द आणि दूरदृष्टि ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या स्वभावातील या पैलूंच्या आधाराने अभि उद्योग समूहाने विविध कार्यक्षेत्रात उत्तुंग भरारी केलेली आहे, भरगोस यश देखील मिळवले आहे. डॉ जोशी हे उच्च शिक्षित आहेत. शालेय आणि प्राथमिक शिक्षण विमलाबाई गरवारे हायस्कूल पुणे येथे झाले इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग या विषयातील ते तज्ञ आहेत. हा विषय घेऊन त्यांनी इंजिनिअरिंगची पदवी मिळवली आहे. मॅनेजमेंट सायन्स या विषयात स्नातकोत्तर पदवी मिळवली आहे. भारतातील वाहतूक क्षेत्रावर संशोधन करून त्यांनी डॉक्टरेट देखील मिळवली आहे. या व्यतिरिक्त त्यांनी विविध विषयांचे डिप्लोमा कोर्सेस केले आहेत. अभि उद्योग समूहाची स्थापना करत त्यांनी कार्पोरेट क्षेत्रात

पदार्पण केले. रियल इस्टेट, फार्मसी, मनोरंजन क्षेत्रात या उद्योग समूहाने काळाच्या विविध टप्प्यांवर प्रवेश केला. आज अभि उद्योग समूहाची किमया सत्तरहून अधिक देशांत पोहचलेली असून, विविध आंतरराष्ट्रीय संस्थांशी ही उद्योग संस्था करारबद्ध झाली आहे. एक यशस्वी उद्योगपती या नात्याने डॉ जोशी यांनी सामाजिक बांधिलकी देखील जपलेली आहे. ते विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक संस्थांच्या विविध कार्यकारी मंडळांचे ते सक्रिय सभासद आहेत. ते जनवार्ता न्यूज या वृत्तसंस्थेचे मुख्य संपादक आहेत, त्यासोबत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडो-जपान, इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स, डेक्कन चेंबर ऑफ कॉमर्सचे सभासद आहेत. शैक्षणिक जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे. विविध इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट कॉलेजमध्ये ते अतिथि प्राध्यापक, सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी सेवा बजावली आहे. या सर्व उल्लेखनीय कार्यासाठी त्यांचा उचित गौरव वेळोवेळी झाला आहे. जनवार्ता न्यूजच्या संपादक पदावर काम करत असता त्यांच्या या संस्थेला महाराष्ट्र राज्य शासनाने माहिती प्रसारण क्षेत्रात उल्लेखनीय सेवा केल्याबद्दल सन्मानित केले. त्याशिवाय युवा उद्योजक पुरस्कार, गल्फ महाराष्ट्र बिझनेस अवॉर्ड, रोटरी लीडरशिप एक्सलंस अवॉर्ड, टाईम्स मेन ऑफ दि ईयर अवॉर्ड अशा काही महत्वाच्या पुरस्कारांचा समावेश आहे. यशाच्या इतकी शिखरे गाठल्यानंतर देखील डॉ जितेंद्र जोशी आणि त्यांच्या सर्व संस्था आजही विविध क्षेत्रांत गुंतलेल्या आहेत.

डॉ जितेंद्र जोशी यांच्या पुढील यशस्वी कार्यकिर्दीस लाख लाख शुभेच्छा!

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**

## वानप्रस्थी....

बेळगाव मधल्या स्वामीछाया प्रतिष्ठान चे वयोवृद्धांचे आशास्थान या बद्दल बरेच ऐकले आणि वाचले होते.मनात एखादं छानसं संकल्प चित्र तयार व्हावं तसं काहीसं झालं. माणसाच्या आयुष्याचे जर चार भाग केले तर जे चार भाग ठरतात ज्याला आमच्या वेदांनी चार आश्रम म्हंटलय त्यातला शेवटचा आश्रम म्हणजे हा वानप्रस्थाश्रम. यालाच महाभारतात स्वर्गारोहण असंही म्हणलय. हा मार्ग निसर्गात, जंगलांच्या सान्निध्यात सापडत असल्याने याला वानप्रस्थाश्रम असेही म्हणतात. ऐहिक सुखाचे पाश तोडायचे असतील चिंता कमी करायच्या असतील तर आपण हा मार्ग स्वीकारायलाच हवा. निसर्गाच्या सान्निध्यात नामस्मरण करत हे शेवटचे क्षण आनंददायी करायचे असतील तर हा टप्पा फार महत्वाचा ठरतो. पण कलियुगात मात्र हा काळ नकोसा वाटायला लागतो. कोणत्याही वयात फक्त पैशासाठी धावणारे, जगणारे आपल्या आवतीभोवती असल्याने आणि संसाराचा मोह न सुटल्याने आम्हाला या आश्रमाची आठवणच रहात नाही.

खेड्यात रोजगारा साठी जाणारे तरूण आणि म्हातारे दोन वेळेच्या अन्नासाठी धावत असतात,शहरातले लोक अन्नाबरोबर सुखसोयी मिळवण्या साठी धावत असतात, अशावेळेस लहान मुलांबरोबर म्हातारी माणसं त्यांचं जेवणखाण, औषधं,आणि सोबतीचा प्रश्न सोडवायला वृद्धाश्रम किंवा डेकेअर खूप उपयोगी ठरतात. आम्ही जसजसे प्रगत होत चाललो आहोत तसतसे कुटुंब रचनेतील बदलही समोर यायला लागले आहेत. त्यामुळेच वृद्धाश्रम ही काळाची गरज म्हणून पुढे येतेय. अशावेळेस गरज भासते ती मदत करणारे हात आणि सामाजिक जाणिवाची दृष्टी असणा-यांची. गरज असते ती वृद्धाश्रमात छोट्या मुलाचे पाळणाघर किंवा बालवाडीची. अनेकांना नातवंडाची उणीव तीथे भरून काढता येते, तसेच अनेक मुलांना आजी आजोबा भेटल्याचा आनंदही मिळतो.

पूर्वी एकच कमावणारा असला तरी सगळ्या नातेवाईकांना सामावून घेणारं एक कुटुंब असायचं चुलत,

मावस, आत्येभावंड विनातक्रार एकत्र मोठी व्हायची, घरातल्या म्हाताऱ्यांचे पथ्यपाणी बघायला घरात आयाबाया असायच्या. पण आता घरात एकच मूल, त्याला पाळणाघर, अशावेळेस आजी आजोबाचं कोण करणार. तेव्हा सगळ्यात सक्षम पर्याय पुढे येतो तो म्हणजे वृद्धाश्रम. स्वतःची स्पेस जपणारे नातेवाईक आपल्या भोवती अशा काही चौकटी घट्ट आखून ठेवतात की कोणालाच त्यात प्रवेश मिळत नाही. अशावेळेस वृद्धाश्रमात मात्र अनेकजण प्रेमाची नाती विणत असतात. एकुलता एक मुलगा परदेशातत, मुलगी सासुरवाशीण. अशा आईवडिलांना खरा आधार मिळतो या वृद्धाश्रमात.

आपल्या वयाचे सुहृदय, वेळेवर जेवण अन औषधे,डॉक्टर, मदतनीस, आणि भोवती सतत माणसं या म्हातारपणातल्या माफक गरजा इथे खात्रीशीर मिळणारच. आणि हो सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तुमची दुःख ऐकणारा मित्र, श्रोता मिळणारच. इथे आधाराच्या हाताबरोबर डोकं ठेवायला खांदे देणारे मित्रही मिळतात.मनोरंजना बरोबर टाळी द्यायला दुसरा हातही लगेच मिळतो. प्रत्येकाचे आजार दुखणी, समस्या थोड्याफार, फरकाने सारखीच असल्याने मनमोकळ्या चर्चा होतात. भक्तिमार्गातले लोक भजन किर्तनात रमतात, तर कोणी चालण्यात, व्यायामात, कोणी पत्त्याचा डाव टाकतो तर कोणी कॅरमवर बाजी मारतो.असे आनंदाचे क्षण म्हणजे स्वर्ग सुखाच्या वाटाच. म्हणून तर हा वानप्रस्थाश्रम सगळ्यांना हवाहवासा वाटतो.आपले पणाचा ओलावा जपतो.

घरकुल नेमकं दिसतं कसं? किंवा आहे कसं? असा प्रश्न वरील माहिती वाचल्यावर नक्कीच मनात येतो आणि उत्तरही मिळतं, आपण जन्मापासून अनेक अनोळखी माणसांच्या सहवासात येतो, आई लग्न करून घरात आली तेव्हा तरी तीची कुठे कोणाशी ओळख होती. पणती प्रत्येक नातं आपलच मानून जगत राहिली, त्याला गृहस्थाश्रम असं छानसं नाव दिलं. तसच काहीसं या वृद्धाश्रमात देखील घडतं कोणताही परिचय, नातं, नसलेली माणसं एकत्र येतात अन वृद्धाश्रमाचं घरकुल कधी बनतं ते लक्षातच येत नाही. या साठी अहोरात्र काम करणारी स्वामीछायाची टीम आणि सर्व सेवक याचबरोबर इथला सुंदर निसर्गही मायेची शाल प्रत्येकालाच देत असतो. अशा या निसर्गरम्य वातावरणात पक्षांच्या सोबतीनं चालतांना वेगळाच आनंद मिळतो. इथला भव्यदिव्य परिसर, ध्यानधारणेचे सभागृह, औदुंबरच्या सान्निध्यात असलेले दत्त मंदिर आपण सगळेच अनिकेत असतो याची जाणीव देत असतं. जॉगीग ट्रॅक आणि योगाभ्यास इथल्या वृद्धांची सकाळ आरोग्यदायी करतात.तर पत्ते, कॅरम, बुद्धीबळ या सारखे बैठे खेळ दुपारच्या वेळेत छान वाटतात. संध्याकाळपर्यंत विश्रांती चहा खाणं सगळेच यथासांग झाल्यावर आरती,ध्यान धारणेची लगबग सुरू होते. रात्री आणि सकाळी जेवणात सकस, रूचकर आणि पचनाला योग्य असा आहार हे सगळेच वेळेत देणारे घरकुल, नात्याच्या पलीकडे वयाच्या पलीकडे, आपुलकी निर्माण करतं. म्हणूनच इथे रमायला होतं

देणाऱ्याने देत जावे.... घरकुल म्हणले की आपलेपणाने आलेल्या प्रत्येकाला जास्तीत जास्त सुविधा मिळाव्या आणी अडचणी कमी करण्यासाठी ही संस्था सदैव तत्पर असतेच पण सर्वांचे हातभार, मदतीच्या रूपात कायमच हवेहवेसे वाटतात. आपण सर्वजण अशा सेवेसाठी आतुर असताच आणि आम्हीपण आमची झोळी घेऊन सज्ज आहोत, तुमची मदत योग्य ठिकाणीच वापरणार याची खात्री देऊन मगच मदत स्विकारणार. शिवाय या मदतीला कोणताही टॅक्स लागू नये यासाठी कायद्यानुसार ८० जी प्रमाणपत्र देखील आहेच. गरज आहे ती तुमच्या सारख्या दातृत्वाची. सतत वाढणारी वृद्धांची संख्या आणि त्यासाठी लागणाऱ्या निवासाच्या खोल्या बांधकामाच्या प्रतिक्षेत आहेत. आपण सुजाण आहातच. आमच्या वेबसाईटवर नक्की भेट घ्या आणि सढळ हाताने मदत करा तन, मन, धन, वस्तू कोणत्याही रूपातली मदत स्वागतार्ह आहेच. धन्यवाद!

(✻ देणगीसाठी ८० जी आणि ✻ सिएसआर सुविधा उपलब्ध आहे)

संपर्क क्रमांक : १) राजीव पोतदार - ९५५२५ ४१३०१, २) नामजी देशपांडे - ९४४८६३४४४० ३) चिंतामणी ग्रामोपाध्ये - ९४४९०६६५२८

## संलग्न संस्था वृत्तांत

**अकोला** : देशस्थ ऋग्वेद ब्राह्मण मंडळ शाखा अकोलाच्या महिला मंडळाच्या वतीने दि १८/९/२२रोजी आपले मंडळाचे भवनात श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण सोहळा आयोजित करण्यात आला ५० महिलांनी सामूहिक पारायणात सहभाग घेतला सकाळी ८ ते ३ यावेळेत हा सोहळा संपन्न झाला.सकाळी मंडळाचे जेष्ठ सदस्य श्री व सौ देशमुख यांचे हस्ते विधिवत संकल्प पूजा करून पारायण ला सुरवात झाली व ३वा आरती व सर्वांना महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली ,अकोला येथील सौ.विभा कुळकर्णी यांनी समोर ग्रँथ वाचन केले तसेच श्रीनवरात्रीचे औचित्य साधुन दुसऱ्या माळेला म्हणजेच दि. २७/९/२२ला मंडळाचे भवनात, महिला मंडळाच्या वतीने, दुपारी ४ वा श्री सुक्त आवर्तन व कुंकुमार्चन आयोजित करण्यात आले होते जवळपास ६० ते ७० महिलांनी यात सहभाग घेतला. सर्वपथम श्री अंबाबाईचे पूजन सौ. ज्योती जोशी यांचे हस्ते करण्यात आले व १६ वेळा श्री सुक्त आवर्तनाला सुरवात झाली नंतर अष्टक व सौ अवंतिका मैराळ हिच्या श्री महिषासुरमर्दिनी स्तोत्राने सांगता झाली, शेवटी आरती, प्रसाद व सर्व महिलांची ओटी भण्यात आली

या दोन्ही सोहळ्याला मंडळाचे पदाधिकरी तसेच सदस्य उपस्थित होते ,सोहळा यशस्वी होण्यासाठी सर्व महिला सदस्यांनी सहभाग घेतला सौ विशाखा देशमुख, श्रद्धा संत, मृणाल कुळकर्णी, पल्लवी देशपांडे, जयश्री वांगीकर, स्नेहल देशमुख, संजीवनी कुळकर्णी, शुभांगी जोशी, ज्योती जोशी, अवंतिका मैराळ, ज्योती देशमुख या सर्व महिलांनी परिश्रम घेतले.

**सोलापूर** : येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राा्हण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या सहकार्याने योगविद्या प्राणिक हिलिंग फाऊंडेशनतर्फे आज दि. २४-०९-२०२२ रोजी ५५ पुरोहितांना अन्नधान्य वाटप करण्यात आले. येथील आयएमए हॉलच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. यावेळी योगविद्या प्राणिक हिलिंग फाऊंडेशनच्या सोलापूर जिल्हा प्रमुख कमल शहा, डॉ. दिपक शिंदे, प्रा. नवनाथ भंडारे, आरती सूर्यवंशी, देऋब्राा संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष शंकर कुलकर्णी, कार्यवाह श्याम जोशी, खजिनदार सतीश पाटील, दत्तात्रय आराध्ये, विजय कुलकर्णी, रविंद्र नाशिककर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक कार्यवाह श्याम जोशी यांनी केले. यावेळी डॉ. येळेगावकर यांनी फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले. फाऊंडेशनच्या कमल शहा व डॉ. दिपक शिंदे यांनी फाऊंडेशनतर्फे जगभरात दररोज होत असलेल्या अन्नदानाची माहीती दिली. सोलापूरातही फाऊंडेशनकडून दरमहा गरीब लोकांना अन्नधान्य वाटप करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दत्तात्रय आराध्ये यांनी आभार मानले.

## वडोदरा (गुजरात)

वडोदरा हे भारताच्या गुजरात राज्यातील एक प्रमुख शहर आहे आणि बडोदा जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे.. या शहराचे गुजराती नाव वडोदरा. हे तिसऱ्या क्रमांकाचे तर भारतामधील २० व्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. वडोदरा शहर विश्वामित्री नदीच्या काठावर राजधानी गांधीनगरच्या १२० किमी आग्नेयेस वसले आहे. १६व्या व १७व्या शतकांमध्ये मुघल साम्राज्याच्या अधिपत्याखाली राहिल्यानंतर अखेर १७२१ साली येथून मुघलांना हुसकावून लावण्यात मराठ्यांना यश आले. १७२१ साली येथे गायकवाड घराण्याने बडोदा संस्थान स्थापन केले. ब्रिटीश राजवटी दरम्यानदेखील बडोदा संस्थानाला स्वायत्त दर्जा होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९४९ साली बडोदा संस्थानाला भारतामध्ये विलीन होणे भाग पडले. इतिहास आणि संस्कृतीचा

वारसा या शहराला लाभला असून येथे शाही इतिहास, भव्य महल, संग्रहालये, वाडे, गार्डन्स, मंदिरे, बाजारपेठ आणि राजघराणे गायकवाड यासाठी ओळखले जाणारे हे शहर आहे महाराजसयाजीराव गायकवाड यांनीहे १०० एकर क्षेत्रात उद्यान तयार केले आहे. देशाच्या पश्चिम भागातल्या सर्वात मोठ्या सार्वजनिक बागांपैकी एक मानले जाते.सरदार पटेल तारामंडळ, बडोदा संग्रहालय आणि पिक्चर गॅलरी, एक टॉय ट्रेन, प्राणीसंग्रहालय, मत्स्यालय वेगवेगळ्या जातींचेवृक्ष आहेत. सध्या वडोदरा गुजरातमधील उद्योगाचे मोठे केंद्र मानले जाते.खनिज तेलउद्योगामुळे वडोदऱ्याची अर्थव्यवस्था बळकट झाली आहे.

## वडोदरा विमानतळ (हर्णी विमानतळ)

शहराच्या ईशान्य भागात आहे व येथून दिल्ली, मुंबई, चेन्नई, बँगलोर इत्यादी प्रमुख शहरांसाठी थेट विमान सेवा आहे. वडोदरा रेल्वे स्थानक भारतीय रेल्वेच्या पश्चिम रेल्वेक्षेत्रामधील सर्वात वर्दळीच्या स्थानकांपैकी एक असून येथे दररोज सुमारे १५० गाड्या थांबतात. वडोदऱ्याहून मुंबई-दिल्ली-सौराष्ट्र या दिशांकडे जाण्यासाठी वडोदरा एक्सप्रेस, राजधानी एक्सप्रेस, गुजरात एक्सप्रेस, सौराष्ट्र मेल, पश्चिम एक्सप्रेस, शताब्दी एक्सप्रेस इत्यादी दररोज सुमारे ५० गाड्या बडोदा स्टेशनवर थांबतात. मुंबई ते दिल्ली दरम्यान धावणारा राष्ट्रीय महामार्ग ८ वडोदऱ्यामधून जातो.

## लक्ष्मी विलास पॅलेस

भारतातील भव्य वाड्यांपैकी एक लक्ष्मी विलास पॅलेस हा वाडा बडोद्याच्या राजघराण्याचा आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरा यांनी बांधलेला विशाल राजवाडा आतापर्यंतचा सर्वात मोठे खाजगी निवासस्थान आहे. लंडनमधील बकिंघम पॅलेसपेक्षा चार पट मोठा आहे. हे इंडो-सारासेनिक आर्किटेक्चरल शैलीचे एक चांगले उदाहरण आहे. वडोदरामध्ये पर्यटन स्थळांपैकी एक आहे राजवाडा असून या पॅलेसमध्ये मोती बाग पॅलेस आणि महाराजा फतेहसिंग संग्रहालय असलेले दरबार हॉल हे प्रमुख आकर्षणे आहेत.

## वडोदरा संग्रहालय, चित्र गॅलरी

वडोदरा संग्रहालय आणि चित्र गॅलरी लंडन सायन्स म्युझियम आणि व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियमच्या धर्तीवर डिझाइन केलेली आहे. हे भूशास्त्र, पुरातत्व आणि नैसर्गिक इतिहासाशी संबंधित कलाकृतींचा संग्रह येथे आहे. या संग्रहालयाच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका महाराज सयाजीराव गायकवाड तिसरा यांच्या वैयक्तिक संग्रहातील विविध वस्तू येथे आहे. वडोदरा संग्रहालयाचे मुख्य आकर्षक निळ्या व्हेलचा सांगाडा आणि इजिप्शियन ममीचा समावेश आहे.

## सूर्य नारायण मंदिर

नावाप्रमाणेच सूर्य नारायण मंदिर सूर्य देवाला समर्पित आहे. मंदिर भव्य पद्धतीने बांधले गेले आहे आणि हे मंदिर भव्य वास्तू वैशिष्ट्यपूर्ण आहे. असे मानले जाते कीसूर्य देवाची आराधना केल्यासआजारपणातून मुक्तता मिळेल. या मंदिरात वर्षभर भाविकांची गर्दी असते.

## सुर सागर तलाव

वडोदरा शहराच्या मध्यभागी सूर सागर हा एक आकर्षक तलाव आहे. जो वर्षभर पाण्याने भरलेले असून येथील शांत वातावरण, संध्याकाळी या तलावावर बसून आपण इथल्या सौंदर्याचे कौतुक करू शकता.

तलावाच्या मध्यभागी १२० फूट उंच मूर्ती असून ती वडोदरामधील सर्वात सुंदर ठिकाण हे असल्याचे मानले जाते.

## ईएमई मंदिर

ईएमई मंदिर हे भारतीय लष्कराद्वारे व्यवस्थापित केलेले एक शिव मंदिर आहे. मंदिर अल्युमिनियमच्या चादरीने झाकलेले आहे. मंदिराची भौगोलिक रचना अदभूत आहे.७ व्या ते १५ व्या शतकातील शिल्पहे मंदिराच्या आसपासच्या बागेचे सौंदर्य आहे.

## स्टॅच्यू ऑफ युनिटी

जगातील सर्वात उंच मूर्ति स्मारक भारतातील पहिले उपमुख्यमंत्री आणि भारत रत्न तसेच आधुनिक भारताचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांना समर्पित आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांना भारताचा आयरन मॅन म्हणूनही ओळखले जाते. ते स्वातंत्र्य सेनानी, वरिष्ठ नेते आणि भारतीय गणराज्य संस्थापक संस्थापकांपैकी एक होते. भारताच्या गुजरात राज्यातील नर्मदा नदी वर असलेल्या साधू बेटावर हे स्मारक आहे. हे स्मारक २०००० स्केवर मीटर मध्ये व्यापले असून सभोवताली १२ चौरस किलोमीटर कृत्रिम तलाव बांधलेले आहे. १८२ मीटर (५९७ फूट) उंची असलेला हा जगातील सर्वात उंच पुतळा आहे. ऑक्टोबर २०१४ मध्ये लार्सन अँड टुब्रोला बांधकाम आणि देखभाल यासाठी २,९८९ कोटी (यूएस  ४२० दशलक्ष) चा प्रकल्प देण्यात आला होता. बांधकाम ३१ ऑक्टोबर २०१४ पासून सुरू झाले आणि ऑक्टोबर-ऑक्टोबर २०१८ मध्ये पूर्ण झाले.हे स्मारक भारतीय मूर्तिकार राम व्ही. सुतार यांनी डिझाईन केलेले आहे आणि पटेलच्या जयंतीच्या दिवशी ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे उद्घाटन केले.

स्टॅच्यू ऑफ युनिटी आठवड्याभरापासून सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत सर्व लोकांसाठी खुली आहे. (सोमवारी बंद), स्टॅच्यू ऑफ युनिटीची देखभाल करणाऱ्या सरदार सरोवर नर्मदा निगम लिमिटेडने आपल्यासाठी तिकीट बुक करणे सोपे केले आहे. आपण एकतर ते स्पॉटवर बुक करू शकता किंवा ऑनलाइन मार्ग घेऊ शकता. सरदार पटेल यांच्या पुतळ्यासाठी ऑनलाईन तिकीट बुकिंग आहे. ३ वर्षाखालील मुलांसाठी, प्रवेश विनामूल्य आहे त्यात अवलोकन डेक, फुलांची व्हॅली, सरदार पटेल स्मारक, संग्रहालय आणि ऑडिओ-व्हिज्युअल गॅलरी, स्टॅच्यू ऑफ युनिटी साइट आणि सरदार सरोवर धरणात प्रवेश आहे. फुलांच्या खोऱ्यात भेट, सरदार पटेल स्मारक, संग्रहालय आणि ऑडिओ व्हिज्युअल गॅलरी, स्टॅच्यू ऑफ युनिटी साइट आणि सरदार सरोवर धरणासह प्रौढांना मूल्य आकारले जातात. वाडिया इथं गुजरात सरकारतर्फे 'टेंट सिटी' उभारण्यात आली आहे. यात असेल्या २५० तंबूमध्ये पर्यटकांची राहण्याची सोय होणार आहे. याशिवाय पुतळ्यापासून ३ किमी अंतरावर ५२ खोल्यांचं थ्री स्टार 'श्रेष्ठ भारत भवन कॉम्प्लेक्स'ही आहे. इथंही पर्यटकांची राहण्याची सोय होऊ शकते. पर्यटकांना https://www.soutickets.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन तिकीट बुक करण्याची सुविधाही देण्यात आली असून नेट बँकिंग किंवा डेबिट कार्डच्या साहाय्यानं पेमेंट करता येणार आहे.

## गरुडेश्वर

या ठिकाणी योगीराज वासुदेवानंद सरस्वती यांची समाधी आहे. हे स्थान नर्मदा नदीच्या तीरावर आहे. सर्व प्रमुख दत्त स्थानात व नर्मदा पुराणात या स्थानाचा उल्लेख आहे . समष्टी कल्याणासाठी स्वामींचा दत्तअवतार असल्याने देवाने त्यांचा गृहस्थाश्रम अल्प समयात अव्यक्त केला. असे महान योगी सन १९१४ मध्ये गरुडेश्वर

येथे चिरकाल निद्रेत विलीन झाले. दत्तसंप्रदायामधे स्वामींचे नाव आदरने घेतले जाते. रस्ता मार्गानेः गुजरात राज्य परिवहन निगमची बस उपलब्ध, राजपिपळा, भरूच, अंकलेश्वर, वडोदरा, छोटा उदेपूर, बोडेली, लुणावाडा, डेडियापाडा, धरमपूर, शाहदा, नंदूरबार. (बडोद्याहून खासगी व शासकीय अशी व्यवस्था आहे) वडोदरा, तेथून एक्सप्रेस हाईवे वरून डभोई रोड वरून रस्ता मार्गे येता येते. श्री गरुडेश्वर दत्त संस्थान,व्हाया राजपीपडा, गरुडेश्वर, जिल्हा नर्मदा, पिनकोड- ३९३१५१, गुजरात. मोबाईल : ९४०९४७९८५८ / ९४०९४५६४४३ फोन : ०२६४४- २३७००५

**बडोदा शहर आणि त्याच्या आसपास स्थळांची माहिती :-** सयाजीबाग, लक्ष्मी विलास पेलेस (सोमवारी बंद), सुरसागर लेक. बडोद्याच्या आसपास :- बडोद्याहून आजवा-नीमेटा - १५ किलो मीटर, पावागढ - ६५ किलो मीटर, डाकोर - ६० किलो मीटर, कुबेर भंडारी-करनाळी, गरुडेश्वर, स्टेचू ऑफ युनिटी (सोमवारी बंद) - एकूण ८० किलो मीटरच्या अंतरावर.

## सुख-समृद्धी, स्वास्थ्य आणि मन:शांतीसाठी आवश्यक वेदप्रणित अग्निहोत्र उपासना

'अग्निहोत्र' हा आपल्या घरी नित्यनियमाने सकाळ-संध्याकाळी करण्याचा यज्ञविधी आहे. स्थानिक वेळेनुसार सूर्योदय व सूर्यास्ताला तो करावयाचा असतो. भारताबरोबरच जगातील बहुसंख्य देशांमध्ये त्याचा प्रसार झाला असून, लाखो लोक श्रद्धापूर्वक हे अग्निपूजन करतात. ज्येष्ठ लेखक रवींद्र गुर्जर त्यांच्या 'किमया' या सदरात या वेळी लिहीत आहेत अग्निहोत्र उपासनेबद्दल... दोन पायांवर उभा राहणारा मानव पृथ्वीवर वावरू लागला, त्याला लाखो वर्षे होऊन गेली. सुरुवातीचा मोठा कालखंड प्राण्यांची शिकार आणि उपलब्ध फळे यांच्यावर उदरनिर्वाह करण्यात गेला. ग्रह-तारे, वनस्पती आणि प्राणी यांनाच माणूस - भीतीपोटी का होईना - देव मानत आला. अग्नीचा शोध अपघाताने लागला आणि मानवी संस्कृतीचा विकास वेगाने होऊ लागला. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांचे पूजन होतच होते. त्यातील तेज म्हणजेच अग्नी. फक्त अन्न गरम करण्यापुरता त्याचा उपयोग नसून, त्यात प्रचंड सामर्थ्य आहे, हे हळूहळू लक्षात आले. त्यातूनच औद्योगिक क्रांतीचा पाया रचला गेला. अणुशक्ती, अग्निबाण हे त्याच ऊर्जेवर निर्माण होतात, चालतात. मूळ स्वरूपातील वेद-वाङ्मय (श्रुती) सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात आले. त्याचेच पुढे महर्षी वेदव्यासांनी सोयीसाठी चार विभाग केले. त्यातील यजुर्वेद हा यज्ञसंस्थेचा मार्गदर्शक ग्रंथ आहे. यज्ञांचे प्रकार, ते कसे करावेत, त्यासाठी लागणारे मंत्र, कालावधी इत्यादी माहिती त्यात आहे. अश्वमेध, राजसूय, पुत्रकामेष्टी, गाईस्पत्य (वैश्वदेव), आहवनीय (यज्ञासाठी तयार करावयाचा अग्नी) इत्यादी नावे आपल्याला ठाऊक आहेत. नित्य, नैमित्तिक आणि काम्य (विशिष्ट कामना ठेवून केलेले) असे त्यांचे तीन प्रकार आहेत. यज्ञात अग्नीला निरनिराळ्या गोष्टींचे हवन (अर्पण) दिले, की विशिष्ट देवता प्रसन्न होतात, असा विश्वास आणि अनुभव लोकांना होता. 'अग्निहोत्र' हा आपल्या घरी नित्यनियमाने सकाळ-संध्याकाळी करण्याचा यज्ञविधी आहे. स्थानिक वेळेनुसार सूर्योदय व सूर्यास्ताला तो करावयाचा असतो. भारताबरोबरच जगातील बहुसंख्य देशांमध्ये त्याचा प्रसार झाला असून, लाखो लोक श्रद्धापूर्वक हे अग्निपूजन करतात. त्याला अत्यंत अल्प कालावधी लागतो.

अक्कलकोट येथील श्री बाळाप्पा महाराजांच्या मठात पूज्य श्री गजानन महाराज (शेगावचे वेगळे) यांचे वास्तव्य होते. लहानपणी त्यांच्या दर्शनाचा योग आला होता. त्याच जागी भगवान परशुराम यांनी सन १९४४मध्ये महाराजांना दर्शन देऊन, 'तू श्रुतींचे पुनरुज्जीवन कर,' असा आदेश दिला. तो शिरसावंद्य मानून त्यांचे वेदकार्य सुरू झाले. त्याचबरोबर, वेदांच्या अंतर्गत येणाऱ्या अग्निहोत्र उपासनेचा जगभर प्रसार करण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली. तेही काम वेगाने सुरू झाले; आणि महाराष्ट्र, संपूर्ण भारत आणि जगभर लाखो घरांपर्यंत ही नित्य उपासना जाऊन पोहोचली. या यज्ञाचे आचारण करणाऱ्या यजमानांचे आणि उपासकाचे अग्निनारायण कल्याण करतो; आपल्या भक्तांना धन-धान्य, पुत्र-पौत्र प्रदान करतो आणि ऐहिक व पारलौकिक कामनांची पूर्ती करतो. अग्नी हे देवतांचे मुख असून, तो शक्तीचा पुत्र आणि देवांचा दूत आहे.

अग्निहोत्र म्हणजे ज्या विधीने अग्नीला उद्देशून होम केला जातो ते कर्म. अग्नीला दिली जाणारी आहुती, तेच अग्निहोत्र. रोज सूर्योदय आणि सूर्यास्ताला होम करून ही उपासना करावी. सकाळी सूर्य आणि प्रजापती यांना आणि संध्याकाळी अग्नी व प्रजापती यांना उद्देशून तांदूळ किंवा यव यांची आहुती दिली जाते. एका अग्निहोत्राच्या उपासनेमुळे सर्व देवतांची उपासना साध्य होते. देवतांनाही अग्निहोत्र अनिवार्य आहे, असे उपनिषदांत सांगितले आहे. श्री गजानन महाराज (शिवपुरी, अक्कलकोट) यांना

‘अग्निहोत्राचे उद्गाते आणि प्रवर्तक’ म्हणून विश्वभर ओळखले जाते. ‘यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वाध्याय’ या पंचसाधन मार्गाचे त्यांनी दिग्दर्शन केले. यज्ञ म्हणजे, परमात्म्याला उद्देशून अग्निमुखी द्रव्याचा त्याग करणे. अग्निहोत्राच्या आचरणाने मानवात शरणागत वृत्ती निर्माण होऊन मन प्रेममय आणि अनासक्त होते. सर्वांसाठी ते अनिवार्य कर्तव्य-कर्म आहे. कालमानाप्रमाणे आपल्या भोवताली प्रदूषण, तणाव, अशांती, रोगराई, निसर्गाचे असंतुलन असे भयानक प्रश्न उभे राहिलेले आहेत. त्या सर्वांचे निराकरण करण्याचे सामर्थ्य अग्निहोत्रात आहे. परमात्म्याने असे अभिवचन दिले आहे, की ‘यज्ञ ही सर्वांना इष्ट ते देणारी कामधेनू आहे. त्याच्या आचरणाने सुख-समृद्धी मिळते, पंचमहाभूते संतुलित होतात.’ देव आणि निसर्ग यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा सहजसुलभ मार्ग म्हणजे अग्निहोत्र होय. ते मुक्तीचे साधन आहे. त्याने अभ्युदय आणि नि:श्रेयस या दोन्हींची प्राप्ती होते.

पिरॅमिडसारखा आकार असलेल्या तांब्याच्या किंवा मातीच्या पात्रात, गायीच्या शेणाच्या गोवऱ्यांपासून तयार केलेल्या अग्नीत, मंत्रोच्चारण करून गायीचे तूप माखलेल्या दोन-दोन चिमटी तांदळाच्या आहुती देणे, म्हणजे अग्निहोत्र होय. त्याने वातावरणशुद्धी होऊन, दिवसभर त्याचा परिणाम राहतो. ज्या घरात, जागेत किंवा शेतात अग्निहोत्र केले जाते, तेथे शुद्धतेचे व पावित्र्याचे कल्याणकारी चक्र कार्यरत होते. त्याचा परिणाम तिथले सर्व सदस्य, प्राणी आणि वनस्पतींवर होतो. अग्नीमध्ये अर्पण केलेला घनपदार्थ जळून जाताना सूक्ष्म ऊर्जातरंग धूम व वायुरूप धारण करून आसमंतात सुगंधी आणि पुष्टिदायक तत्त्वांच्या रूपाने पसरतात. या उपासनेचा अन्य कोणत्याही उपासनेशी विरोधाभास नाही. त्याने पर्जन्यचक्राचेही संतुलन होते. त्याच्या भस्माचा शेती व वनस्पतींच्या वाढीवर उत्तम परिणाम होतो. परिणामत: अधिक सकस व स्वादिष्ट अन्न, धान्य, फळे-फुले आणि भाजीपाला पिकतो. त्या वातावरणात रोगजंतूंच्या वाढीसही प्रतिबंध होतो, असे संशोधनात आढळून आले आहे. स्थिर-चर, सजीव-निर्जीव अशा सर्व वस्तूंमधील प्राणशक्ती विकसित होते. मन प्रसन्न आणि आनंदी होते. मुलांच्या मनावरही त्यामुळे उत्तम परिणाम होतो व त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. अभ्यासात एकाग्रता साधते. व्यसनांपासून मुक्तता होऊन, दुर्दम्य इच्छाशक्ती निर्माण होते, हे अनुभव सिद्ध झाले आहे.

अग्निहोत्र विधी : हा यज्ञ रोज करताना पाच नियमांचे पालन करावयाचे असते; म्हणजे त्याचे इष्ट परिणाम दिसून येतात.

**वेळ :** आपण ज्या गावी असू, तिथली सूर्योदय आणि सूर्यास्ताची अचूक वेळ जाणून घ्यावी. तशी वेळापत्रके उपलब्ध असतात. त्या मुहूर्तावर उपासना केल्याने वैश्विक ऊर्जेचा फायदा मिळतो. त्याने आपले मानसिक आणि शारीरिक संतुलन साधते. **अग्निहोत्र पात्र :** पिरॅमिडसारख्या आकाराचे तांब्याचे किंवा मातीचे पात्र (कुंड) वापरणे आवश्यक आहे. विधी करताना उष्णता आणि विद्युत-चुंबकीय ऊर्जेचे तरंग निर्माण होतात. हे शुद्धिकारक तरंग भोवतालच्या वातावरणात प्रक्षेपित होतात. **आहुती :** दोन चिमटीत मावतील इतके अखंड (न शिजवलेले) तांदळाचे दाणे आहुतीसाठी वापरावेत. ते तुटलेले, अर्धे असू नयेत. तांदूळ जगात कुठेही सहज उपलब्ध असतात. **गोघृत, गोमय :** गायीच्या दुधापासून तयार केलेले तूप अग्निहोत्रात आहुतीसाठी वापरले जाते. तांदळाच्या दाण्यांना हे तूप व्यवस्थित लावावे. दुसरे तूप वापरू नये. त्यात पुष्टि-तुष्टिदायक, विषाचा नाश करणारे आणि ओज देणारे गुणधर्म आहेत. त्याच्या ज्वलनाने हे सर्व औषधी गुणधर्म सूक्ष्म तरंगांच्या द्वारे वातावरणात वेगाने पसरतात. त्यायोगे वातावरण शुद्ध प्राणशक्तीने भारले जाते. अग्निहोत्राचा अग्नी गायीच्या शेणापासून तयार केलेल्या गोवऱ्या वापरून तयार केला जातो. गोवरीचा लांबसर पातळ तुकडा घेऊन त्याला तूप लावावे आणि तो अग्निहोत्राच्या पात्रात, नीट रचलेल्या गोवऱ्यांत मधोमध ठेवून पात्र प्रज्वलित करावे. त्याला हाताने किंवा पातळ पुठ्ठ्याने हवा द्यावी. फुंकर मात्र मारू नये.

**सूर्योदयाचे मंत्र :** (पहिला मंत्र) सूर्याय स्वाहा, सूर्याय इदं न मम।। (दुसरा मंत्र) प्रजापतये स्वाहा, प्रजापतये इदं न मम।। **सूर्यास्ताचे मंत्र :** (पहिला मंत्र) अग्नये स्वाहा, अग्नये इदं न मम।। (दुसरा मंत्र) प्रजापतये स्वाहा, प्रजापतये इदं न मम।। हे संस्कृतमधील वेदमंत्र आहेत. म्हणायला सोपे आहेत. मंत्र म्हणजे विशिष्ट अर्थ आणि ध्वनिलहरी यांच्यापासून वेदांनी तयार केलेले सूत्र. त्याच्या जपाने, त्यावर मनन-चिंतन केल्याने मन:शांती आणि शक्ती प्राप्त होते. सजीव प्राणी व वनस्पतींवरही मंत्र विलक्षण परिणाम करतात. सूर्योदयाला दोन आणि सूर्यास्ताला दोन असे स्पष्ट, शुद्ध स्वरूपातील मंत्र उच्चारून आहुती दिली, की अग्निहोत्राचा विधी पूर्ण होतो.

नित्य अग्निहोत्र आचरणाने घरातील वातावरण शुद्ध व पवित्र राहते; सुगंधी पुष्टितत्त्वाने भारले जाते. दोन्ही वेळेस विधी केल्याने २४ तास त्याचा इष्ट परिणाम टिकून राहतो. ताणतणाव दूर होऊन मन प्रसन्न राहते. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती टिकून राहते. रोगजंतूंच्या वाढीला प्रतिबंध होतो. घरातील मुलेही शांत होतात. होमाचे भस्म बागेतील झाडांना खत म्हणून वापरावे. त्यांची उत्तम वाढ होते. अग्निहोत्र आध्यात्मिक प्रगतीला पूरक ठरते. कुटुंबातील सदस्य समंजसपणे एकमेकांशी बांधले जातात.

जगातील कोणतीही व्यक्ती अग्निहोत्र करू शकते. जात-पात, धर्म-पंथ, वर्ण, स्त्री-पुरुष, देश असे कुठलेही बंधन त्याला नाही. घरात कुठेही योग्य जागी किंवा बाहेरगावी गेल्यास सोयीस्कर ठिकाणी, बागेत, शेतातही हा विधी करता येतो. जगभर लाखो लोकांनी अग्निहोत्राचे लाभ आणि उत्तम परिणाम अनुभवलेले आहेत.

# जोडीदार निवडा

**वर पाहिजे...........................................................................................................**

● नाव – **डॉ. सिद्धी अनिल आराध्ये**, जन्मतारीख – १३.१२.१९९५, ब्राह्मण पोट शाखा, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्मवेळ – सकाळी ७.३५, राशी – सिंह, गण – राक्षस, नाडी – अत्यं, चरण – पहिले, शिक्षण – बी.डी.एस., नक्षत्र – मघा, योनी – उंदीर, गोत्र – भारद्वाज, उंची – ५ फूट ५ इंच. अपेक्षा – अनुरूप, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी शाखेतील असावा. पत्ता – अनिल गोपाळराव आराध्ये : घर नं. ४६१४, १–अ गाताडे प्लॉट जुना कराड नाका मागे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, संपर्क – ७३५०२९४७८९/८७६६५४१७१२

● नाव – **कु. स्नेहा धनंजय लोहोगावकर**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, शाकाहारी, जन्मतारीख – १७.०३.१९८९, वय ३३ वर्ण – गोरा सडपातळ, रास – कर्क, नक्षत्र – पुष्यचरण १ नाडी – मध्य, उंची –५.१, शिक्षण – सी. एस. एल. एल. बी. (C. S. LLB), नोकरी – खाजगी कंपनीत C. S. मुंबई मध्ये. आई वडील सेवानिवृत्त आहेत. १ भाऊ B.Sc / MBA असून मुबईत नोकरी करीत आहे. अपेक्षा – उच्चशिक्षित, सुसंस्कृत, शाकाहारी, निर्व्यसनी, अनुरूप. अधिक माहितीसाठी संपर्क – आई सौ. मधुरा ध. लोहोगावकर, मोबाईल नं. ९८६९०३९४६६

● नाव – **कु. गायत्री श्रीपाद थिटे**, पत्ता : ४७ए, बझार रोड, बांद्रा (प.), मुंबई–५०. दूरध्वनी : ९१४६९८३९१६. ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ. जन्म दिनांक : ०४ मे १९९४. गोत्र : भारद्वाज, वय : २८, उंची : ५ फूट ३ इंच, वर्ण : गोरा, शिक्षण : १२वी पास (इंग्रजी माध्यम), भाऊ/बहीण : नाही. अपेक्षा : स्वतःचे घर, आईवडिल असलेला परिवार मुंबईस्थित, कायम स्वरूपी नोकरी.

● नाव : **कु. अपूर्वा मोहन बहिरट**. ब्राह्मण पोटशाखाः देशस्थ ऋग्वेदी, भ्रमणध्वनी : ९८७०७१४७३०, ९८७०७५७००४, पत्ता : कांदिवली, मुंबई, जन्म तारीख/वेळ : ११.०७.१९९३, सकाळी ११.३५, जन्मस्थळ : नाशिक, उंची : ५ फूट, गोत्र : बादरायण, रास : मीन, नक्षत्र : रेवती, चरण : १, गण : देव, नाडी : अंत्य, मंगळ : नाही, वर्ण : गहू वर्ण, बांधा : मध्यम, शिक्षण :– B.Com, नोकरी व ठिकाण – मुंबई, हुद्दा (पोस्ट) : Sr. Accounts Executive, अपेक्षा : प्रथमवर, उंची ५ फूट ४ इंच ते ५ फूट ८ इंच. मुंबई पुणेस्थित प्राधान्य, कोणत्याही शाखेचा पदवीधर, स्वतःचे घर असावे, निर्व्यसनी, समंजस, मनमिळावू.

**वधू पाहिजे...........................................................................................................**

● नाव – **संकेत माधव जोशी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – १७.०६.१९९४, गोत्र – वशिष्ठ, उंची – ५.१०, शिक्षण – बी कॉम, एम.बी.ए., जन्म वेळ – सकाळी ०७.४५, जन्म स्थळ – डोंबिवली, नाडी– आध्य, गण – मनुष्य, रक्तगट – बी पॉझिटीव्ह, अपेक्षा – पदवीधर, नोकरी करणारी, अनुरुप. संपर्क – श्री. माधव सदाशिव जोशी, मो. नं. – ८८७९१०३६८/९९२०५६५७७७, पत्ता – ०३, सनमून सोसायटी, शिववल्लभ रोड, युनिव्हर्सल शाळेजवळ, अशोकवन, बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६.

● नाव – **कौशिक उल्हास ठाकुरद्वारकर**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – ०५.०१.१९९४, गोत्र – विश्वमित्र, उंची – ५.७, शिक्षण – बी.ई. (मॅकेनीकल), जन्म वेळ – सकाळी ७.३९, जन्म स्थळ – डोंबिवली, नाडी – आद्य, गण – देव, रक्तगट – बी पॉझिटीव्ह, अपेक्षा – अनुरुप, पदवीधर, वयातील अंतर १ ते ४ वर्षे असावे, सगोत्र नको. संपर्क – श्री. उल्हास रामचंद्र ठाकुरद्वारकर, मो.नं. ९८६९१८१५९८/९०८२४९६४१२, पत्ता – ६०१, अवनी स्वप्नधरा सोसायटी, घोडबंदर रोड, तत्त्वज्ञान विद्यापीठ जवळ, ठाणे (पश्चिम) – ४००६१०.

(**टीप** : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील.)

***आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!***
***सर्वांना सुख, शांती आणि समृद्धी लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!***

## ऋग्वेद भूषण - डॉ. गजानन एकबोटे



जीवनात यशस्वी होण्याची संधी सर्वांनाच प्राप्त होत असते. परंतु या संधीचे यशात रुपांतर करणे सर्वांनाच शक्य होत नाही. सातत्यपूर्ण परिश्रम, दुरद्रुष्टी, अभ्यासूपणा आणि सतत प्रयोगशील असणं. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संघटन कौशल्य. या सर्व गुणांच्या आधारे आपल्या महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रातील मोठे नाव म्हणजेच प्रा. डॉ. गजानन एकबोटे. डॉ. एकबोटे यांचा जन्म सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील मॉडर्न हायस्कूल येथे तर मॅट्रीकनंतरचे शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. आई वडीलांकडून संस्कार व देशप्रेमाची शिकवण ही त्यांना मिळाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत ते वाढले. मेहनतीने अभ्यास करून पुण्याच्या नामांकित बी. जे. मेडीकल शासकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. ही पदवी विशेष प्राविण्यासह प्राप्त केली. भारताच्या नामवंत ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस, नवी दिल्ली येथून एम.एस. ही पदवी सुवर्ण पदकासह प्राप्त केली. स्वतःचा दवाखाना स्थापून वैद्यकीय सेवाही त्यांनी केली. त्याचबरोबर डी.जे.मेडीकल शासकीय महाविद्यालयात सर्जरी विषयाचे प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. आज ही ते कार्यरत आहेत. ८४ हून अधिक संशोधनपर शोध निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जनरल्स् म्हणून प्रसिद्ध झाले आहे. डॉ. एकबोटे यांना विद्यावाचस्पती या सर्वोच्च पदविची समकक्षता महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिककडून बहाल करण्यात आली आहे. १९८६ साली त्यांचे शिक्षक व गुरु कै. म.गो.चाफेकर यांनी प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची जबाबदारी सांभाळावी असा आग्रह त्यांच्याकडे धरला. अत्यंत जबाबदारीने त्यांनीही जबाबदारी सांभाळली आणि या जबाबदारीचे खऱ्या अर्थाने सोने केले. जनमानसात प्रोग्रेसिव्ह संस्थेची उज्वल अशी प्रतिमा निर्माण केली. श्री. एकबोटे यांनी अभियांत्रिकी औषधनिर्माण शास्त्र, जैवतंत्रज्ञान, व्यवस्थापन शास्त्र विधि, शिक्षण शास्त्र, सुक्ष्म जिवशास्त्र, संगणक शास्त्र, कृषी या शाखांची महाविद्यालये व अभ्यासक्रम त्यांनी सुरु केली. डॉ. एकबोटे यांच्या धाडसी व दुरदृष्टी वृत्तीमुळे १९९३ पासून आतापर्यंत ७-८ शाळा, महाविद्यालये, ६५ ते ७० संस्था निर्माण झाल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळेच शिवाजीनगर, निगडी, मोशी, भोसे या ठिकाणी अत्याधुनिक संकुले उभी राहिली. विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या हिताच्या अनेक योजना, विविध पुरस्कार, महाविद्यालयांना अर्थसहाय्य योजना, प्रकल्पासाठीचे अनुदान, शैक्षणिक प्रवेश, नवे शैक्षणिक धोरण, परीक्षा पद्धती, विद्यापीठ कायदा परिनियम या सर्व गोष्टीतील डॉ. एकबोटे यांचे सखोल अभ्यास, चिंतन व अनुभव हे कायम आठवणीत राहीले आहे. शिक्षण व उच्च शिक्षणातील अभ्यासू वृत्ती व गाढा अनुभवामुळे त्यांचा शब्द हा प्रमाण मानला जातो. पुणे विद्यापीठाचा नामविस्तार सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे असा करताना विद्यापीठाच्या अधिसभेत त्यांनी घेतलेली भूमिका विद्यापीठाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहावी अशीच आहे. डॉ. एकबोटे सरांना सावित्रीबाईं फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून मानाचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. एकबोटे यांनी विविध शिक्षण संस्थेच्या शाखा आज कार्यरत आहेत. शैक्षणिक गुणवत्ता जास्तीत जास्त कशी वाढविता येईल याकडेच त्यांनी सर्व लक्ष केंद्रित केले आहे. भारतीय सांस्कृतिच्या आदर्श मुल्यांचा डॉ. एकबोटे यांना कधीही विसर पडला नाही. उत्तमोत्तम विद्यार्थी घडविणे आणि उत्तम नागरिक समाजाला आणि राष्ट्राला देणे हाच देशसेवेचा मार्ग त्यांनी मानला आहे.

डॉ. गजाननराव एकबोटे यांचे शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल व पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी अनेक-अनेक शुभेच्छा!

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**



*With*
*Best*
*Compliments*
*From*

S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

MRH

painttech
CONSULTANTS



Generations Technology Changes BUT HULYALKAR SAME

**Mukund R. Hulyalkar**

Visits:
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For outstation)

**Acrylic Distemper**
**2**
**Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

NATIONALIST CONGRESS PARTY
**Mukund R. Hulyalkar — Paint Technologist**
Vice-President: South Central Mumbai Dist

| | | |
|---|---|---|
| **Hon. Editor** | : | Paint India |
| ***Secretary*** | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| **President** | : | Deshastha Rugvedi Brahman Sangha, Dadar |
| ***I P President*** | | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| ***Patron Member*** | : | Winner's Academy - Thane |
| ***Member*** | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| ***Award*** | : | ISSPA Mitra Award (2012) |
| | | Udyogshree By Maharashtra State Government |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile: 9821099494 • Tel.: 022-24456214 • Fax.: 022-24314865
E-mail: painttech_con@yahoo.com • Website: www.painttechconsultants.com

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

।। संहति : कार्यसाधिका ।।

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ



## रौप्य महोत्सवी अधिवेशन / परिषद
## बडोदा (गुजरात)

चला एकत्र येऊया आपली संस्कृती जपूया !

**दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०२२**

**स्थळ : श्री दादा भगवान तीर्थक्षेत्र, केलनपुरी, डभोई रोड, वडोदरा ३९०००४ (गुजरात)**

**अध्यक्ष - श्री. विलास जोशी** **कार्याध्यक्ष - श्री. प्रभाकर कुलकर्णी**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष (वडोदरा) - श्री. नितीन शहापुरकर**

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, वडोदरा**

**मुख्य कार्यालय** - लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०००१६
दूरध्वनी : २४३०२२७३ / २४३०७५७६ - Email: aadram@gmail.com

**बडोदा कार्यालय** - **देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ,** द्वारा उमेश अरविंद सुरतकर, "सोना" बदामडीबागे समोर, शंकर टेकडी, दांडीया बाजार, वडोदरा - ३९०००१ - दूरध्वनी : ९७१२६९२९७३ - Email: milind_tattoo@yahoo.co.in

मुद्रक, प्रकाशक आणि संपादक **श्री. मिलिंद म. सरदेशमुख** यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने गुरुकृपा, शॉप नं. ३, रोझरी बिल्डिंग, एम.एम.सी मार्ग, माहीम (पश्चिम), ४०० ०१६, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. संपादक **श्री. मिलिंद म. सरदेशमुख**